प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 2266 0358

२४ जानेवारी, २०१३

# कुका चळवळीच्या १५० व्या वर्षाच्या स्मरणार्थ ₹५ ची नाणी देणे

भारत सरकारने वर निर्देशिलेली नाणी तयार केली असून, ती रिझर्व बँकेद्वारा लवकरच प्रसारात ठेवली जातील. ह्या नाण्यांचा आकार, डिझाईन व धातुमिश्रण पुढीलप्रमाणे असेल.

| मूल्य | आकार व बाहेरील व्यास | खाचांची संख्या | धातु-मिश्रण |
|---|---|---|---|
| पाच रुपये | गोलाकार, २३ मि.ली मीटर | १०० | **निकेल पितळ**<br>तांबे - ७५%,<br>जस्त - २०%,<br>निकेल - ५% |

**डिझाईन**

| मूल्य | दर्शनी बाजू | मागील बाजू |
|---|---|---|
| पाच रुपये | ह्या नाण्यावर मध्यभागी अशोक स्तंभावरील सिंह **"सत्यमेव जयते "** असतील व त्याच्या डाव्या कडेस **भारत** हा शब्द देवनागरी लिपीत असेल. आणि उजव्या किनारीजवळ, **"INDIA"** हा शब्द इंग्रजीमध्ये असेल. ह्या सिंहाच्या खाली रुपयाचे चिन्ह "₹" असेल व त्याचे मूल्य दर्शविणारा अंक ५ हा आंतर-राष्ट्रीय अंकात दिला असेल. | मागील बाजूस, मध्यभागी सद्‌गुरु राम सिंह जी ह्यांची प्रतिमा व डाव्या बाजूस त्यांच्या अनुयायांना फासावर चढविल्याची प्रतिमा तर उजव्या बाजूस ते अनुयायी तोफेच्या तोंडासमोर उभे असल्याची प्रतिमा दिली असून, डाव्या किनारीजवळ, कूका आंदोलन के १५० वर्ष हे शब्द देवनागरीत खोदलेले असतील व उजव्या किनारीजवळ १५० इयर्स ऑफ कुका मूव्हमेंट हे शब्द इंग्रजीत खोदलेले असतील. सतगुरु रामसिंह जी हे देवनागरीतील शब्द डावीकडील प्रतिमेच्या वरच्या बाजूस असतील तर उजवीकडील प्रतिमेच्या वरच्या बाजूस 150 YEARS OF KUKA MOVEMENT हे शब्द इंग्रजीत असतील. प्रतिमेच्या खाली, संबंधित वर्षाचे अंक १८५७ २००७ आंतरराष्ट्रीय अंकात दर्शविलेले असतील. |

कॉईनेज अधिनियम, २०११ मध्ये निर्देशित केल्यानुसार ही नाणी वैध असे चलन आहेत. ह्याच मूल्यामधील विद्यमान असलेली नाणी, वैद्य चलन असणे सुरुच राहील.

**वृत्तपत्रासाठी निवेदन - /२०१२-२०१३/१२५२**

**अजित प्रसाद**
सहाय्यक महाव्यवस्थापक